मला वाचायला आवडतं

# मुंगीची भटकंती

सी. जे. डेनिस
गौरी गुप्ता यांची चित्रे



कथाचे ३००एम थिंकबुक





एकदा एका इवल्याशा मुंगीला करायची होती भटकंती -
घरापासून एकदम लांब, जगाच्या पाठीवरती.

तिने पोटभर नाश्ता खाल्ला आणि आईची घेतली परवानगी
तिला जे पाहायचं होते ते पाहण्यासाठी चालू लागली बिगी बिगी

पानाच्या वर आणि खाली, दगडाच्या अवती भवती
एका काळोख्या गल्लीत जिथे तिला वाटत होती भीती





तब्बल सात इंचांच्या डोंगरावर ती कष्टाने चढली
गवताच्या घनदाट जंगलात, जिथे होती आभाळाची सावली

नेचा झाडातून, शेवाळ्यावरून नागमोडी वळणे घेत ती पोहोचली
एका वाळवंटापाशी जिथे होती फक्त वाळू आणि माती

एक कोरेड, ओसाड वाळवंट, जिथे नव्हती साधी पायवाट
तिला वाटलं पटकन घरी जाऊ आणि पहुडले राहू आरामात

तिचे इवलेसे पाय डळमळत होते आणि शक्तीही सगळी संपली होती
त्यामुळे ती परत फिरली आणि तिने ही वाट धरली -



लांबच लांब पसरलेल्या वाळवंटातून ती माघारी वळली
नेचाच्या पुलावरून नागडमोडी वळणांतून ती चालू लागली



गवताच्या घनदाट जंगलात आभाळाच्या सावलीखाली
मग ती चढली तब्बल सात इंच उंच टेकडी

त्यानंतर पोहोचली काळोख्या गल्लीत, जिथे एकटीला वाटत होती भीती
नेचाच्या पानांच्या वर-खाली, आणि दगडाच्या अवतीभवती

दमलेल्या, थकलेल्या मुंगीनं ठरवलं, बस्स झालं फिरणं
बागेचा रस्ता ओलांडून म्हणाली आपलं घरच बरं.




**सी. जे. डेनिस** हे ऑस्ट्रेलियन कवी होते आणि विनोदी कवितांसाठी प्रसिद्ध होते. ऑस्ट्रेलियातील तीन सर्वात प्रसिद्ध कवींमध्ये त्यांचे नाव घेतले जात असे.

# KATHA

कथा ही जागतिक पातळीवरील मान्यताप्राप्त स्वयंसेवी संस्था (www.katha.org) आहे. ही संस्था १९८८ सालापासून साक्षरतेपासून ते साहित्यापर्यंत विविध क्षेत्रांत अविरतपणे काम करत आहे. प्रकाशन आणि गरीब मुलांच्या शिक्षणासाठी काम करण्याचा आमचा सुमारे ३० वर्षांचा अनुभव आहे.

“भारताच्या शिरपेचातील शैक्षणिक हिरा.” **- नाओयुकी शिनोहारा, व्यवस्थापकीय उपसंचालक, आयएमएफ**

“कथा हा जगभरातील कल्पक प्रकल्पांसाठी एक आदर्श उदाहरण आहे, जो शहरातील सामान्य व नाट्यमय व्यथांना टिपतो.” **- चार्ल्स लँड्री, द आर्ट ऑफ सिटी मेकिंग**

“कथाला मुलांबद्दल ममत्व आहे. म्हणूनच ही संस्था मुलांसाठी इतकी सुंदर पिक्चर बुक्स म्हणजेच चित्रपुस्तके तयार करते” **- टाइम आउट**

“मुले ही कथाच्या पुस्तकांमध्ये जसा बदल घडवतात तसा त्यांच्या समुदायामध्ये शाश्वत आणि प्रत्यक्ष बदल घडवू शकतात, या संकल्पनेवर कथाचे काम आधारलेले आहे” **- पेपरटायगर्स**


प्रथम आवृत्ती वर्ष २०२१


कॉपीराइट © कथा, २०२१
मजकूर कॉपीराइट © सी. जे. डेनिस
इलस्ट्रेशन कॉपीराइट © कथा


ए३, सर्वोदय एन्क्लेव्ह, श्री अरबिंदो मार्ग, नवी दिल्ली ११००१७
फोन: ९१-११ ४१४१ ६६००. ४१४१ ६६१०
ई-मेल: editors@katha.org, Website: www.katha.org
ISBN 978-93-82454-65-6


**आमचे मिशन :** प्रत्येक मूल उत्तम वाचेल आणि मजेसाठी वाचेल!

कथा ही नोंदणीकृत स्वयंसेवी संस्था असून ही संस्था १९८८ साली सुरू झाली. आम्ही साक्षरतेपासून ते साहित्यापर्यंतच्या क्षेत्रात अविरत काम करत आहोत. मुलांमध्ये आणि प्रौढांमध्ये वाचनाची आवड वृद्धिंगत व्हावी यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत, आम्ही गरीबीत जगत असलेल्या १,००,००० मुलांसोबत काम करत असून दर्जेदार पुस्तके आणि इतर प्रयत्नांच्या माध्यमातून त्यांना श्रेणी पातळीवर आणण्यासाठी आम्ही प्रयत्न करत आहोत.


सर्व हक्क आरक्षित. प्रकाशकाच्या लेखी पूर्वपरवानगीशिवाय या पुस्तकातील कोणताही भाग पुनरुत्पादित केला जाऊ नये किंवा कोणत्याही प्रकारात वापरून नये.


या पुस्तकांच्या विक्रीमधून मिळणाऱ्या उत्पन्नाचा १०% भाग वंचित विद्यार्थ्यांच्या वाचनासाठी आणि आयुष्यभराच्या अध्ययन कार्यक्रमांना सहाय्य करण्यासाठी देण्यात येतो.




## ही सर्व आयएलआर पुस्तके

इन द ग्रीन सीरिज

मनोरंजनात्मक आणि अर्थपूर्ण वाचन करा


































FOR OUR BOOKS

www.books.katha.org

"कथा... भारतीय प्रकाशन इतिहासातील एक खास आणि वैशिष्ट्यपूर्ण चळवळ."
- द आयकॉनिक इकोनॉमिक टाइम्स

मुलांसाठी
'कथा'चे पुस्तक
ISBN 978-93-88284-81-3
www.katha.org
₹ xxx